Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

# डी.टी.एड. छात्रध्यापकांचा प्राथमिक स्तरावर इंग्रजी विषयाच्या अध्यापनासाठी भाषण कौशल्यात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास व उपाययोजना

**राजीव भास्कर देशमुख,**
**पीएच. डी. संशोधक/ प्राचार्य,**
**अध्यापक विद्यालय, दिंडोरी, ता. दिंडोरी,**
**जि. नाशिक.**

## प्रास्ताविक

डी.टी.एड. अध्यापक विद्यालयात प्रामुख्याने ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी अधिक ओढ असल्याचे लक्षात आलेले आहे. शहरी भागातील विद्यार्थी आपल्या आवडीनूसार व्यावसायिक अभ्यासक्रमाची निवड करतात. अर्थात त्यांच्याकडे आर्थिक व राहण्याची सुविधा असल्याने त्यांची डी.एड. शाखेकडे कमी ओढ असल्याचे लक्षात येते. या शिवाय सध्या तर विद्यार्थ्यांमध्ये ८०% मुलींचें प्रमाण डी.एड. शाखेत आहे. विद्यार्थीनी पेठ, सुरगाणा, कळवण, वणी, चांदवड, त्र्यंबक अशा परिसरातून आल्याने आपल्या आर्थिक परिस्थितीतून वसतीगृहात राहून १२वी पर्यंतचे शिक्षण कसेबसे पूर्ण करतात. मात्र 'इंग्रजी' सारखा विषय १२वी पर्यंत शासनाने सक्तीचा केल्याने 'इंग्रजी' उत्तीर्ण होणे म्हणजे 'साक्षात दिव्यत्त्वाचा साक्षात्कार' असे प्रत्येकाला वाटते. डी.एड. नंतर आपल्या मुलीला लगेच नोकरी मिळेल या हेतूने पालक मुलींना डी.एड. प्रवेश घेऊन देतात. मात्र याच विद्यार्थीनी जेव्हा इंग्रजीत ३५ ते ४० मार्कानी पास होऊन डी.एड. ला येतात तेव्हा व्दितीय वर्षात त्यांना इंग्रजी विषयाचे चार पाठ घेणे अनिवार्य आहे. या प्रत्येक पाठास ३० मिनिटे विद्यार्थ्यांनी मातृभाषेचा वापर न करता सलग ३० मिनिटे विद्यार्थ्यांशी इंग्रजीतून सुसंवाद साधावा ही परिक्षकांची इच्छा असते. मात्र माझ्ा डी.एड. शाखेत १० वर्षाच्या अनुभवात असे लक्षात आले की, शेकडा ९५% विद्यार्थ्यांना इंग्रजीमध्ये स्पष्टीकरण देता येत नाही. स्वत:बद्दलची पाच ते सहा वाक्य अस्खलितपणे आत्मविश्वासाने बोलता येत नाही. काहींना काळांचे प्रकार सांगता येत नाही. क्रियापदाची तिन रूपे सांगता येत नाहीत. अशा अवस्थेत सलग ३० मिनिटे इंग्रजी अध्यापनासाठी काय करायचे? हा जटील प्रश्न माझ्यासमोर होता. ही समस्या सोडविण्यासाठीच मी प्रस्तुत समस्या निवडून त्यासाठी अनोख्या उपक्रमाची निवड केली.

## १. इंग्रजी भाषण कौशल्य विकासासाठी उपक्रम

भाषण व कौशल्य विकसित करण्यात पूर्वी, विद्यार्थ्यांच्या बौध्दीक ज्ञानाची चाचणी घेण्यासाठी, विद्यार्थ्यांना

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

स्वत:बद्दल पाच वाक्य बोलण्यास सांगितली. मात्र यामध्ये ९०% विद्यार्थी जे १२वी ला इंग्रजी विषयासह उत्तीर्ण झाले त्यांना २ वाक्य देखील आत्मविश्वासाने बोलता आली नाही. मात्र याबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात 'इंग्रजी' बद्दल भिती निर्माण न करता, 'मी आज तुम्हाला जादुच्या सहाय्याने इंग्रजी बोलण्यास शिकविणार आहे, तुम्हाला इंग्रजी बोलता येणारच' हा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये निर्माण केला. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी मनापासून सूचनांकडे लक्ष केंद्रित केले.

## २. ओ.एच.पी. चार्टचा वापर

इंग्रजी भाषण कौशल्य विकासासाठी सर्वप्रथम स्वत:च्या परिचयाची पाच ते सात वाक्ये तयार केली. वाक्यांमध्ये काही जागा अपूर्ण ठेवल्या. त्या जागी विद्यार्थी स्वत:चे नांव, शाळेचे नांव, आवडता विषय, आवडता मित्र यांची नावे सांगतील या हेतूने सर्वप्रथम परिचय देतांना कसे उभे रहावे? Eye contact कसे असावे? शारिरीक हालचाली कशा असाव्यात? याचे मार्गदर्शन करून दाखविले. ओ.एच.पी. चार्टच्या मदतीने विद्यार्थी वाक्य वाचून परिचय सांगू लागले. एक आठवड्याच्या सरावानंतर विद्यार्थी स्वत: आत्मविश्वासाने परिचय देऊ लागले. यामध्ये आदिवासी व ग्रामीण भागातील मुलींच्या बोलण्यात देखील कमालीची सुधारणा दिसून आली. याच पद्धतीने विद्यार्थ्यांना मित्रांची ओळख, आई-वडीलांविषयी पाच वाक्ये, शाळेची, शिक्षकांची माहिती, आवडत्या वस्तुची माहिती शिकविली. प्रत्येक विद्यार्थी इंग्रजीत बोलू लागला. इंग्रजी विषयाची भिती विद्यार्थ्यांच्या मनातून कमी होण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला.

## ३. भाषण कौशल्य विकासासाठी दैनंदिन जीवनातील संवादाचा वापर

विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाची भिती कमी होऊन त्यांच्यामध्ये भाषण कौशल्य विकसित करण्यासाठी रोजच्या जीवनात आपण इतरांशी जी वाक्ये बोलतो, त्याच वाक्यांचा वापर केला. यामध्ये शिक्षक, विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षक, दुकानदार, गिऱ्हाईक इत्यादी

## ४. वाक्यांचे भाषांतर

यामध्ये विद्यार्थ्यांना २० वाक्ये इंग्रजीत लिहून दिली. व त्याचे मराठीत भाषांतर लिहून दिले. सर्वांचे वाचन, मनन झाल्यानंतर रोल नं. प्रमाणे एक-एक विद्यार्थी समोर येऊ लागला. बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी प्रत्येक विद्यार्थी कोणतेही वाक्य मातृभाषेत सांगू लागला. यामुळे देखील विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाची भिती कमी होऊन आवड निर्माण होण्यास मदत झाली.

### ५. इंग्रजीत वेळ कशी विचारावी? कशी सांगावी?

भाषण कौशल्याच्या विकासामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यास इंग्रजीत वेळ कशी सांगावी? किती वाजून, किती मिनिटे झाली? पावणेसात, सव्वासात, साडेसात वाजण्यास किती मिनिटे कमी अशी वाक्ये इंग्रजीत लिहून दिली. त्याचे मराठी भाषांतर लिहून दिले. यामुळे प्रत्येक विद्यार्थी स्वत: इंग्रजीत वेळ सांगू लागला.

### ६. फोनवरून संभाषण कसे करावे? (Telephonic Conversation)

यामध्ये रोजच्या जीवनात मित्रांशी, घरच्या लोकांशी, शिक्षकांशी, मुख्याध्यापकांशी जी-जी सोपी वाक्ये बोलतो त्या वाक्यांची निवड करून विद्यार्थ्यांना इंग्रजीत लिहून दिली. त्यामध्ये प्रत्येक वाक्याला १, २, १, २ याप्रमाणे नंबर दिले. जसे फोन करणारा नं.१ चे वाक्य बोलेल तर समोरील व्यक्ती नं. २ चे वाक्य बोलेल याप्रमाणे वर्गात चार्ट (शैक्षणिक साधनांचा वापर) करून विद्यार्थ्यांना बोलण्याचा सराव दिला. दोन आठवड्याच्या सरावानंतर प्रत्येक विद्यार्थी फोन संभाषण या उपक्रमात स्वत:हून आत्मविश्वासाने सहभागी होऊ लागला. विद्यार्थ्यांचे भाषण कौशल्य विकसित होण्यास मदत झाली.

डॉक्टर-पेशंट, आई-मुलगा अशा पात्रांचे संवादाचे सोपी पाच ते सहा वाक्य निवडून ती चार्टवर लिहिली. त्या प्रत्येक वाक्याला १, २, १, २ याप्रमाणे नंबर दिले. जर शिक्षक-विद्यार्थी संभाषणात १ नंबरचे वाक्य शिक्षकाचे तर २ नंबरचे वाक्य विद्यार्थ्याचे ठेवले. त्यानंतर दोन-दोन विद्यार्थ्यांच्या गटाला समोर बोलावून एकाने फक्त १ नंबरचे वाक्य वाचायचे, तर दुसऱ्याने फक्त २ नंबरचे वाक्य वाचायचे. अशा पद्धतीने संवाद वाचण्यास लावले. याचवेळी वाक्याच्या आशयानूसार आवाजातील बदल, वाक्य वाचन गोष्टी समजून सांगितल्या. परिणामी सर्वच विद्यार्थी उत्स्फूर्तपणे या उपक्रमात सहभागी झाले. प्रत्येक जण इंग्रजी बोलण्यासाठी आपआपसात स्पर्धा करू लागला. यामध्ये उत्कृष्ठ बोलणाऱ्याला बक्षिस जाहीर केल्याने प्रत्येकांमध्ये एक स्पर्धा निर्माण झाली. कधीही वर्गात न बोलणारे विद्यार्थी इंग्रजी बोलण्यासाठी पुढे येऊ लागले, हा खूप मोठा बदल दिसून आला.

### ७. आपकी अदालत

विद्यार्थ्यांच्या भाषण कौशल्याच्या विकासासाठी आपकी अदालत हा आगळा वेगळा कार्यक्रम राबविला. यामुळे विद्यार्थ्यांने हावभाव, eye contract, body language या गोष्टी विकसित होण्यास मदत झाली. यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला स्वत:चे नाव, कॉलेजचे नाव, आवडता विषय, आवडता खेळ, नेता, कलावंत, आवडता छंद,जीवनातील महत्त्वाकांक्षा अशी सोपी वाक्ये इंग्रजीत लिहून दिली. त्यानंतर वर्गातील शिक्षकांच्या जागी एक खुर्ची ठेवली. त्यामध्ये नंबरप्रमाणे एक-एक विद्यार्थी येऊन बसू लागला. वर्गातील प्रत्येक रांगेतील एका विद्यार्थ्याने दिलेल्या सूचनेप्रमाणे प्रश्न

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

विचारण्यास सांगितले. बसलेले विद्यार्थी उत्तरे देऊ लागले. दोन आठवड्याच्या सरावानंतर विद्यार्थी वहीचा वापर न करता इंग्रजीत उत्तरे देऊ लागले.

### ८. इंग्रजीत परिपाठ कसा घ्यावा

डी.एड., व बी.एड., विद्यार्थ्यांना परिपाठ हे प्रात्यक्षिक अनिवार्य आहे. यामध्ये १९ घटक सादर करावयाचे असतात. जसे, प्रतिज्ञा, संविधान, सुविचार, बातम्या, बोध कथा, विज्ञान जगत, व्यक्तीविशेष यासाठी प्रत्येक घटकांच्या सूचना इंग्रजीत सादर करण्यासाठी कशा सूचना द्यायच्या? यासाठी प्रत्येक सूचना अगदी सावधान-विश्राम पासून विद्यार्थ्यांना इंग्रजी व मराठी अर्थासह लिहून दिली. रोज प्रत्येक सूचना वाचण्याचा सराव विद्यार्थ्यांकडून करून घेतला. प्रत्येक विद्यार्थ्याला सूचनेचा अर्थ लिहून दिला. त्यानंतर बातमीपत्र, व्यक्तीविशेष, बोधकथा या गोष्टी सोप्या भाषेत लिहून दिल्या. अवघड शब्दांचे अर्थ मराठीत लिहून दिले. अवघड शब्दांचे उच्चार लिहून दिले. दोन महिने परिपाठ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वहीत पाहून परिपाठ घेण्यास सांगितले. परिणामी सरावानंतर प्रत्येक विद्यार्थी वहीचा वापर न करता स्वतः इंग्रजीमध्ये आत्मविश्वासाने परिपाठ घेऊ लागला.

### ९. वर्गात दोन विद्यार्थ्यांनी सुविचार सांगावा?

भाव व कौशल्याच्या विकासासाठी हा देखील वेगळा उपक्रम राबविला. यासाठी विद्यार्थ्यांना २५ सुविचार मराठी अर्थासह लिहून दिले. हा सुविचार इंग्रजीत करून सादर करावयाचा? याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर रोल नंबर प्रमाणे रोज दोन विद्यार्थी इंग्रजीची तासिका सुरू होण्याअगोदर सुविचार सांगू लागले. परिणामी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला. व विद्यार्थी इंग्रजी सहजतेने बोलू लागले.

### १०. इंग्रजीसाठी एक मिनिट

या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना इंग्रजी संभाषण/ भाषणाचा आनंद मिळावा यासाठी विद्यार्थ्यांने एका मिनिटात कोणतेही दोन इंग्रजी वाक्ये बोलायची. यामुळे विद्यार्थी आनंदाने, आत्मविश्वासाने त्यांना आवडेल ते इंग्रजी वाक्य बोलू लागले. परिणामी विद्यार्थ्यांचे भाषण कौशल्य विकसित होण्यास मदत झाली.

### ११. इंग्रजी विषयाच्या अध्यापनात वापरल्या जाणाऱ्या सूचनांचा सराव

प्रत्येक डी.एड. विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचे अध्यापन करताना इंग्लिश मिडीयम शिक्षिका ज्याप्रमाणे सहजतेने विद्यार्थ्यांशी इंग्रजीत संभाषण करतात, इंग्रजीत सूचना देतात. चित्राचे स्पष्टीकरण देतात, अशा स्वरूपाची प्रासंगिक वर्गात

गेल्यापासून पाठ संपेपर्यंत शिक्षकांनी कोणकोणती इंग्रजी वाक्ये बोलणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांना प्रश्नोत्तरे देताना शिक्षकांनी कसे बोलावे? अशा आशयाचा ५० वाक्यांची निवड केली. प्रत्येक वाक्याचे मराठीत भाषांतर लिहून दिले. प्रत्येक सूचना प्रत्येक विद्यार्थ्यांकडून चार ते पाच वेळा म्हणून घेतल्या. अशा प्रकारचा विद्यार्थ्यांना १५ दिवस सराव दिला. परिणाम आदिवासी/ ग्रामीण भागातील विद्यार्थी सहजतेने आत्मविश्वासाने मराठी भाषेचा वापर न करता इंग्रजीत स्पष्टीकरण करू लागले. परिणामी सर्वच विद्यार्थ्यांचे भाषण कौशल्य काही प्रमाणात विकसित झाल्याचे लक्षात आले.

**१२. उपक्रमाची यशस्वीता / समारोप**

अशा प्रकारे वरील विविध उपक्रमांच्या माध्यमातून शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे संभाषण/भाषण कौशल्य विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांनी दैनंदिन सराव दिल्यास विद्यार्थ्यांचे इंग्रजी भाषण कौशल्यात निश्चितच विकास होईल असा आत्मविश्वास व खात्री या उपक्रमातून साध्य होईल असा विश्वास वाटतो.